**नियमित दिवाणी कब्जा क्र.१६१/२०१४ मधील नि.क्र. ४८ वरील आदेश**

( पारीत दिनांक – ०५/०१/२०२४)

एकनाथ केरबा पाटील वि. आनंदा कृष्णात पाटील.

**CNR -MHKO130001612014**

**१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांच्याविरुध्द झालेला दिनांक ०३/०८/२०२३ रोजीचा 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**२.** प्रतिवादी यांच्या कथनानुसार, प्रस्तुत कामी वादीने सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. दि. ०३/०८/२०२३ रोजी प्रतिवादी हजर नव्हते म्हणून व अर्ज दिला नसल्यामुळे 'उलटतपास नाही' असा आदेश पारित झाला आहे. प्रतिवादींनी जाणून–बुजून उलटतपास घेणेचे टाळलेले नाही. प्रतिवादी हे उलटतपास घेणेस तयार आहेत. सबब, वरील कारणास्तव, त्यांच्याविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**३.** सदर अर्जावरती वादीने अर्जाच्या मागील बाजूस त्यांचे म्हणणे दाखल केले असून त्यांनी अर्जातील संपूर्ण कथने नाकारलेली आहेत. अर्जातील सर्व कारणे ही खोटी व लबाडीची नमुद केलेली आहेत, त्यामुळे, सदर अर्ज खर्चासह नामंजूर होणेस पात्र आहे असे वादीचे कथन आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा व मंजूर करणेचा झालेस खर्च स्वरुपात रु.२००/– इतकी कॉस्ट मिळावी अशी वादीची विनंती आहे.

**४.** उभय बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**५.** अभिलेखाचे अवलोकन करता, प्रस्तुत प्रतिवादी यांच्याविरुध्द दि. २१/०८/२०२३ रोजी 'उलटतपास नाही' असा आदेश पारित करण्यात आला आहे असे दिसून येते. दि. ०३/०८/२०२३ रोजी प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे कोणताही 'उलटतपास नाही' असा आदेश प्रतिवादी यांचेविरुध्द करण्यात आला आहे असे दिसून येत नाही. मात्र, असे असले तरी, नैसर्गिक न्याय तत्त्वाचा विचार करता, प्रतिवादी यांना वादीचा उलटतपास घेण्याची संधी देणे योग्य राहील, तसे न झाल्यास नैसर्गिक न्याय तत्त्वाचे उल्लंघन होईल असे वाटते. निश्चितपणे,

सदरच्या अर्जामुळे व प्रतिवादी यांच्या कृत्यामुळे दाव्याच्या कामी जो विलंब झाला, त्याकरीता काही रक्कम खर्च स्वरुपात प्रतिवादींवर बसविणे योग्य राहील. सबब, वरील सर्व कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र. ४८) प्रतिवादी यांनी वादी यांना आज तारखेपासून ७ दिवसांच्या आत रक्कम रुपये २००/– ही खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करण्यात येतो.

स्वाक्षरी/–.

कागल.

**(अमोल भारत जवळे)**

दिनांक – ०५/०१/२०२४

सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.